भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2023 ◑ 67AA 998242

1 8 OCT 2023

अ. नं. 26915 दि. ........ रु. ........ पैकी रु. ........

श्री. / श्रीमती / सौ. नीलाध्री. उवेंद्र मिश्राचे

पत्ता F-01 सौम्य रेसिडेन्सी. चेतना नगर नाशिक

हस्ते अनिकेत पिंगळे

सही

श्री. सं. रा. अमृतकर
स्टॅम्प वेंडर, नाशिक,
(मु.वि.प.क्र.-२०३/२००२)

TREASURY OFFICE NASIK
1 1 OCT 2023
STPHC ATO

NOTARIAL FIVE RUPEES (×5)

NOTARY
M. R. DHORE
NASHIK DIST.
REGN. No. 10520
Expiry Date 31/10/2023
GOVT. OF INDIA

NOTARY
NOTED & REGISTERED
at Serial No. 4982
DATE 19/10/2023
This Document Contains
Total 9 Pages

सौ. नीलाक्षी देवेंद्र मिशाळ
वय : ४१ वर्षे धंदा : नोकरी
पॅन : AOCPR7647L
सौ. जयश्री दामोदर भोटकर                    लिहून घेणार
वय : ६९ वर्षे धंदा :गृहिणी
पॅन : ABJPR3187R
दोघे रा. फ्लॅट नं.१, सौम्य रेसिडेन्सी,
एकमुखी दत्त मंदिर जवळ, चेतना नगर,
राणे नगर, नाशिक - ४२२००८

...यांसी...

श्री. विवेकानंद नारायण चौधरी
वय ५१, धंदा व्यवसाय
पॅन : ADWPC4257G                    लिहून देणार
रा. आस्था ४/१, अभियंता नगर, कामटवाडे,
नाशिक. ४२२००८

**कारणे ज्यादा सुख-सुविधा करारनामा लिहून देतो ऐसा जे कि,**

१ अ) मिळकतीचे वर्णन :- तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगर पालिका हद्दीतील शहर नाशिक-4 या शिवारातील बिनशेती प्लॉट मिळकत यांसी गट/ सर्वे / भूमापन क्र. 901/102 यातील प्लॉट क्र. 102 यांसी क्षेत्र 301.92 चौरस मीटर (प्लॉट चे क्षेत्र 290.49 चौरस मीटर व नाशिक मनपा यांना रस्त्या साठी वर्ग केलेले क्षेत्र 11.43 चौरस मीटर) यांसी चतुः सीमा पुढील प्रमाणे:-

पूर्वेस -: कॉलनी रोड
पश्चिमेस : प्लॉट नं. 104
दक्षिणेस : प्लॉट नं. 103
उत्तरेस : कॉलनी रोड

येणेप्रमाणे जल, तरु, काष्ट पाषाण, निधि निक्षेप तदंगभुत वस्तुंसह, मिळकतीत जाणे-येणेसाठी असलेले वागवहिवाटीचे रस्ते वापरण्याचे हक्कांसह, लेआऊट मधील सामाईक सुविधा वापरण्याचे हक्कांसह, चतुः सिमेतील बिनशेती प्लॉट मिळकत दरोबस्त.

१ ब) या दस्ताचा विषय असलेल्या फ्लॅट मिळकतीचे वर्णन :-वर कलम 1 यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवर मंजूर केलेल्या बिल्डिंग प्लॅननुसार बांधण्यातआलेल्या "सह्याद्री हाईट्स" या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट / सदनिका क्र.201 (दोनशे एक) यांसी सदनिकेचे कारपेट क्षेत्र ५०.९४ चौरस मीटर + बाल्कनी चे क्षेत्र १९.५५ चौरसमीटर हि सदनिका मिळकत यासी मिळकतीच्या चतु:सीमा पुढील प्रमाणे-

पूर्वेस :- इमारतीची मोकळी जागा
पश्चिमेस : इमारतीची मोकळी जागा
उत्तरेस :- इमारतीची मोकळी जागा
दक्षिणेस : फ्लॅट / सदनिका नं. २०२ व लॉबी व लिफ्ट

येणेप्रमाणे चतुः सिमेतील फ्लॅट मिळकत त्यात समाविष्ट असलेले दोन बेडरूम्स्, हॉल, किचन, बाल्कनी, संडास बाथरूम, फिटींग, फिक्चर्ससह, विज पाणी कनेक्शनसह मिळकतीत जाण्यायेण्याचे वागवहिवाटीचे हक्कांसह, इमारतीतील सामाईक सुखसुविधा, तसेच मिळकतीचे अनुषंगाने असलेली पार्किंग वापरण्याचे हक्कांसह तसेच डीड ऑफ

डिक्लरेशनमध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर मिळकतीचे अनुषंगाने एकुण मिळकतीत प्राप्त 10% मतदानाचे व मालकी हक्कांसह दरोबस्त.

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही सह्याद्रि बिल्डकॉन यांचे खरेदी मालकीची मिळकत असून मिळकतीचे रेकॉउंट ऑफ राईटला मालक म्हणून त्यांचे नावाची नोंद झालेली आहे. सदर मिळकतीवर सह्याद्रि बिल्डकॉन यांनी सह्याद्रि हाईट्स या नावाचे इमारतीचे बांधकाम सुरू केलेले आहे. सदर फ्लॅट नं. २०१ ही मिळकत लिहून घेणार यांनी सह्याद्रि बिल्डकॉन यांचेकडून खरेदी घेणेचा व्यवहार केलेला आहे. त्याप्रमाणे सह्याद्रि बिल्डकॉन यांनी लिहून घेणार यांचे लाभात मे सह दुय्यम निबंधक, नाशिक - यांचे कार्यालयात सदर फ्लॅट मिळकतीचा करारनामा लिहून व नोंदवून दिलेला आहे.

E
T.
K
10520
Date
10/2023
T. OF INDIA

३) सदरील करारनाम्यात नमूद केल्याप्रमाणे सह्याद्रि बिल्डकॉन यांनी लिहून घेणार यांचे रो हाऊस मिळकतीस पुरवित असलेल्या सुविधांचे वर्णन नमूद केलेले आहे. सदरील सुविधांव्यतिरीक्त लिहून घेणार यांना अतिरीक्त व ज्यादा सुविधा आवश्यक आहेत. सदरील अतिरीक्त व ज्यादा सुविधा करून देणेकामी लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना विनंती केली व सदरील अतिरीक्त व ज्यादा सुविधांकरीता स्वतंत्र किंमत देण्याचे मान्य व कबूल केले. त्यानुसार लिहून देणार व लिहून घेणार यांचे दरम्यान सदर बाबत साधक बाधक चर्चा होऊन लिहून देणार यांनी सदरील सुविधा देण्याचे मान्य व कबूल करून सदरील करारनामा लिहून घेणार यांचे लाभात लिहून दिलेला आहे.

४) सदरील कलम १ यात वर्णन केलेल्या रो हाऊस मिळकतीमध्ये लिहून घेणार यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे ज्यादा सुविधांची मागणी केलेली आहे. सदरील मागणी केल्याप्रमाणे सदरहू सुविधांची सदनिकेच्या किंमतीव्यतिरीक्त किंमत खाली नमूद केल्याप्रमाणे कायम करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| **अ.क्र. तपशिल** | **रक्कम** |
|---|---|
| १. सदनिकेच्या खिडक्या श्री टँक (जिंदाल) पावडर कोटेड स्लायडींग विंडोज बसवणे. | ५०,०००/- |
| २. पर्ल ब्लॅक ग्रेनाइट किचन ओटा स्टेनलेस स्टील सिंक तसेच बसविणे स्लॅब लेवल पर्यंत डाडो टाईल्स बसविणे | ७५,०००/- |
| ३. संडास आणि बाथरूम मध्ये डाडो टाईल्स स्लॅबलेवल पर्यंत बसविणे. | ६०,०००/- |
| ४. सदनिकेच्या खिडक्यांना सेफ्टी ग्रिल आणि खिडक्यांचे चौकटीला ग्रेनाइट फ्रेम बसविणे. | ५०,०००/- |
| ५. सदनिकेच्या आतील बाजूस ट्रॅक्टर इमलशन पेंट करणे. | ७५,०००/- |
| ६. सिरामिक डायमंड फ्लोअरींग २×४. | १,६०,०००/- |
| ७. हॉल मध्ये पी.ओ.पी. | १,१०,०००/- |
| **एकूण** | **५,८०,०००/-** |

येणेप्रमाणे वर कलम १ यात वर्णन केलेल्या रो हाऊस मिळकतीत लिहून घेणार यांनी मागणी केलेप्रमाणे वर नमूद केलेल्या सुविधा वरील दराप्रमाणे लिहून देणार यांनी पुरविण्याचे मान्य व कबूल केलेले आहे.

५) वर नमूद केल्याप्रमाणे तुम्हास पुरविण्यात येणाऱ्या जादा सुविधांची एकूण किंमत रक्कम रू. ५,८०,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख ऐंशी हजार मात्र) इतकी मात्र तुमचे व माझे दरम्यान कायम करण्यात आलेली आहे. सदरील किंमत आजचे बाजार भावाप्रमाणे

योग्य व रास्त असल्याची खात्री करूनच तुम्ही माझेशी सदर बाबत व्यवहार कायम केलेला असून किंमतीचा भरणा तुम्ही मला पुढीलप्रमाणे अदा केलेला आहे व करावयाचा आहे.

| रक्कम रू. | तपशिल |
|---|---|
| ५,८०,०००/- | अक्षरी रूपये पाच लाख ऐंशी हजार मात्र लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर फ्लॅट मिळकतीचा ताबा घेतेवेळी अदा करावयाचे आहेत. |
| **५,८०,०००/-** | **एकूण अक्षरी रूपये पाच लाख ऐंशी हजार मात्र.** |

६) सदरहू मिळकतीमध्ये मी तुम्हास पुरवित असलेल्या जादा सुविधांची तुम्ही वेळोवेळी खात्री करून घ्यावयाची आहे. सदरहू सुविधा पुरविलेनंतर तुम्हास सदरहू सुविधांबाबत कोणताही वाद अथवा हरकत उपस्थित करता येणार नाही..

७) सदरहू करारनाम्यानुसार मिळकतीमध्ये लिहून देणार यांनी कामकाज केलेले असून तुम्हास व मला सदरील करारनामा रद्द करता येणार नाही.

४

८) सदरचा करारनामा लिहून देणार, लिहून घेणार यांचेवर व उभयतांचे वाली वारस यांचेवर देखील बंधनकारक आहे व राहील.

येणेप्रमाणे सदरचा करारनामा लिहून देणार बांनी राजीखुशीने स्वसंतोषाने,समजून उमजून, वाचून, ऐकून घेवून, कोणत्याही धाक, दडपणास बळी न पडता लिहून घेणार यांचे नावे लिहून दिला असून त्यावर खाली सह्या करणारे साक्षीदारांसमक्ष लिहून देणार व लिहून घेणार यांनी आपापली सही, अंगठा केलेला आहे. हा करारनामा.

नाशिक.



सौ. नीलाक्षी देवेंद्र मिशाळ

श्री. विवेकानंद नारायण चौधरी
( लिहून देणार )



सौ. जयश्री दामोदर भोटकर
( लिहुन घेणार )



Aniket Pingale.
Parties are Identified by me

NOTARY
M. R. DHORE
AREA DIST. NASHIK
REGD.No 1052
Expiry Date 31/10/2023
GOVT. OF INDIA

ATTESTED

MUKUND R. DHORE
Advocate & Notary Govt.of India
District Court Compound.Nasik-2